लोकमत

# ‘जेडीआयईटी’च्या सिव्हिल इंजिनीअरिंग विभागाचे १३ विद्यार्थी गुणवत्ता यादीत

लोकमत न्यूज नेटवर्क

**यवतमाळ :** जवाहरलाल दर्डा एज्युकेशन सोसायटी संचालित येथील जवाहरलाल दर्डा अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या सिव्हिल इंजिनीअरिंग विभागाचे १३ विद्यार्थी गुणवत्ता यादीत झळकले आहे. संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठातर्फे घेण्यात आलेल्या सत्र २०२०-२०२१च्या गुणवत्ता यादीत ‘जेडीआयईटी’च्या ६३ विद्यार्थ्यांनी स्थान मिळविले. यात सिव्हिल इंजिनीअरिंग शाखेतील १३ विद्यार्थ्यांचा समावेश आहे.

हृतिक चव्हाण, श्रीया जावळकर व प्रसाद मांडेकर यांनी गुणवत्ता यादीत प्रथम स्थान मिळविले आहे. प्रथमेश नंदनवार याने दुसरा, तर चौथे स्थान कोमल निखार व अनिकेत श्रीराव यांनी पटकाविले आहे. प्रतीक तायडे पाचव्या स्थानावर राहिला. सहाव्या स्थानी नयन देशपांडे, विश्वास राठोड, पायल गिरी आणि वैशाली राऊत हे विद्यार्थी राहिले. नवव्या स्थानी सूरज गायकवाड, तर दहाव्या स्थानावर जसलीन नानारे हा विद्यार्थी आला आहे. या निकालासोबतच विद्यार्थ्यांनी विद्यापीठाच्या गुणवत्ता यादीत स्थान मिळविण्याची परंपरा कायम राखली आहे. गुणवत्ता यादीत झळकलेल्या या विद्यार्थ्यांचे जवाहरलाल दर्डा एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष देवेंद्र दर्डा, सचिव किशोर दर्डा, प्राचार्य डॉ.रामचंद्र तत्त्ववादी आदींनी कौतुक केले.


हृतिक चव्हाण


श्रीया जावळकर


प्रसाद मांडेकर


प्रथमेश नंदनवार


कोमल निखार


अनिकेत श्रीराव


प्रतीक तायडे


नयन देशपांडे


विश्वास राठोड


पायल गिरी


वैशाली राऊत


सूरज गायकवाड


जसलीन नानारे